**एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन :**
शेवग्याच्या पूर्ण वाढलेल्या झाडाला दरवर्षी १० कि. चांगले कुजलेले शेणखत, ७५ ग्रॅम नत्र (१६५ ग्रॅम युरिया), ५० ग्रम स्फुरद (३१२ ग्रॅम सुपर फॉस्फेट) व ७५ ग्रॅम पालाश (१२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) ही खते द्यावीत.

**आंतरमशागत :** शिफारस केलेल्या अंतरावर शेवग्याची लागवड केल्यास बागेच्या व झाडाच्या दोन्ही बाजूस ट्रॅक्टरद्वारे मशागत करणे शक्य होते. छोट्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने ट्रिलर व रोटर मारल्यास तणांचे नियंत्रण चांगले होते. तसेच खोडाभोवती तणे व माती भुसभुशीत करण्यासाठी छाटणीनंतर लगेच हलकी टिचणी करणे फायदेशीर ठरते. टाकलेली खते मातीमध्ये मिश्र होण्यास मदत होते व पावसाचे पाणी जमिनीत मुरते.

**शेवगा पिक सरंक्षण :**

- **पाने गुंडळणारी अळी:** अळी पाने गुंडाळून त्यावर उपजिविका करते. या किडीच्या नियंत्रणासाठी थायोमेथॉक्झाम १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. झाडाभोवती नांगरट करावी. प्रकाश सापळा वापरावा.
- **शेवगा कॅन्कर :**
  या रोगाच्या प्रादुर्भावामुळे रापांची जून ते ऑगस्ट या महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मर होते. या रोगाच्या नियंत्रणासाठी, शेवग्याचे बी पेरणीपुर्वी ०.१ टक्का कार्बेन्डॅझीमच्या द्रावणात २४ तास बुडवून ठेवावे व मग पेरणी करावी. कार्बेन्डॅझीम ०.१ टक्का किंवा १ टक्का बोर्डोमिश्रण द्रावण रोपांच्या बुंध्याशी ओतावे तसेच कार्बेन्डॅझीम (०.१ टक्के) रोपांवर फवारावे.
- **शेवग्यातील मर :** या रोगाच्या प्रादुर्भावामुळै रोपांची मोठ्या प्रमाणावर मर होते. पेरणीपुर्वी बियाणे कार्बेन्डॅझीम (१ ग्रॅम प्रति लिटर) बुरशीनाशकाच्या द्रावणात २४ तास बुडवून नंतर पेरावे. उगवणीनंतरच्या बुरशीनाशकाच्या एकूण तीन फवारण्या दर १० दिवसांच्या अंतराने द्यावात.

संदर्भ : शेतीवाडी कोकणची-२०१८ कृषि दैन्यदिनी डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१९३/२०१८

**प्रकाशक**
**डॉ. किरण कोकाटे**
संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**अर्थ सहाय्य**
**प्रकल्प संचालक,**
आत्मा,
धुळे


**सह-संपादक**
**डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र,
म.फु.कृ.वि., राहुरी

**संपादक**
**डॉ. पंकज पाटील**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

## अवर्षणप्रवण भागासाठी उत्तम भाजीपाला पिक

# शेवगा







**लेखक**

**श्री. रोहित व्हि. कडू**
शास्त्रज्ञ (उद्यानविद्या)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

**श्रीमती अमृता राऊत**
शास्त्रज्ञ (कृपअ)
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

**श्री.जगदीश काथेपूरी**
शास्त्रज्ञ (कृषिविद्या)
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१९३/२०१८

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**
**कृषि विज्ञान केंद्र,**
कृषि महाविद्यालय, धुळे-४२४००४
दुरध्वनी क्रं. (०२५६२)२३०३६२
संकेतस्थळ: http://www.kvkdhule.org
*E-mail* : pckvkdhule@gmail.com
pckvkdhule@rediffmail.com

# अवर्षणप्रवण भागासाठी उत्तम भाजीपाला पिक-शेवगा

- शेवगा हे एक अल्प कालावधीत अल्पखर्चात अत्यल्प पाण्यात निसर्गाशी जुळवून घेवून शाश्वत उत्पादन देणारे भाजीपीक आहे.
- शेवगा पानांत अ जीवनसत्व पुरेसे असते. शेवगा पानामध्ये गाजराच्या चारपट जीवनसत्व "अ" संत्र्याच्या सातपट जीवनसत्व "क" दुधाच्या चारपट कॅल्शिअम व दुप्पट प्रथिने आणि केळीपेक्षा तीनपट पोटॅशिअम असते. शेवगा पानांचा रस हे एक अल्प टॉनिक आहे. शेवग्याच्या उकडलेल्या शेंगा अगर शेवगा शेंगाची भाजी यात ॲन्टिबायोटिक्स सारखी प्रतिजैविके असतात. त्यामुळे घसा व त्वचारोग बरे होतात. त्यांच्या सेवनाने रक्ताभिसरण चांगल्या प्रकारे होते.
- शेवगा लागवड ही पुढील काही महत्त्वाच्या बाबींमुळे खुप मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.
  - शेवगा हे पीक हलक्या माळरान जमिनीत तथा बांधावरही उत्तम प्रकारे येते.
  - कोरडवाहू फळझाडात एक उत्तम आंतरपीक म्हणून शेवगा चांगले उत्पादन देतो.
  - निर्यातक्षम पीक म्हणून शेवग्याला व्यापारी दृष्ट्या फार महत्त्व प्राप्त झाले आहे.
  - तुलनेने इतर पिकापेक्षा दर एकरी शेवगा लागवड खर्च अत्यंत कमी आहे.
  - एकदा लागवड केल्यानंतर पाच ते सहा वर्षापर्यंत उत्पन्न घेता येतो, त्यामुळे दरवर्षी होणाऱ्या लागवड खर्चात मोठी बचत होते.

**शेवग्याच्या सुधारित जाती -**

**पी.के.एम-२ :**

शेवगा लागवड केल्यापासून अवघ्या सहा महिन्यात शेंगाचे उत्पादन येते. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनासाठी जास्त काळ वाट पहावी लागत नाही. शेंगा ६० ते ७५ से.मी. लांब असून मध्यम जाडीच्या, जास्त गराच्या आणि उत्तम चवीच्या असतात. तसेच, शेंगा हिरव्या रंगाच्या असून जास्त चमक असलेल्या असतात त्यामुळे ग्राहक जास्त पसंत करते. शेवग्याची लागवड केल्यानंतर ३ ते ४ वर्षापर्यंत झाडे उत्पादन देतात. तसेच या जातीवर रोग, किडींचा विशेष परिणाम जाणवत नाही. कमी पाण्यामध्ये दोन बहरापासून सरासरी प्रतिझाड ३५०-४०० शेंगा मिळतात.

**के.डी.एम.०१- भाग्या :** लवकर ४-५ महिन्यात फळधारणा, हिरव्यागार व आकर्षक शेंगा (६५-७० सें.मी.), फांद्याचे प्रमाण जास्त व भरपूर उत्पादन देणारी, वर्षाला २००-३०० शेंगा प्रति झाड (२० ते ३० किलो) छाटणीतंत्र वापरुन ८ X ८ फूट लागवडीस योग्य. शेवग्याच्या इतर जातीमध्ये कोकण रुचीरा, पीकेएम - १, कोईमतूर - १ व २ आदींचा समावेश होतो.

**जमीन :** हलक्या ते मध्यम आणि पाण्याचा योग्य निचरा होणाऱ्या जमिनीत तसेच डोंगर उताराच्या जमिनीत हे पीक चांगले येते. भारी काळ्या जमिनीत शेवग्याची झाडे जोमाने वाढतात, शाखीय वाढ जास्त होते. अशा जमिनीत झाडांवर ताण चांगला बसत नाही, त्यामुळे फुलांचे व शेंगांचे प्रमाण कमी रहाते. परिणामी शेवग्याचे उत्पन्न कमी येते. अशा जमिनीत हे पीक जिरायत म्हणून घ्यावे. चोपण जमिनीत शेवग्याची वाढ चांगली होत नाही. शेवग्यासाठी निवडलेल्या जमिनीचा साामू ६ ते ६.५ च्या दरम्यान असावा.

**हवामान :** शेवग्याच्या उत्तम वाढीसाठी दमट हवामान चांगले. तापमान २५ ते ३० डिग्री से. मध्ये झाडाची वाढ चांगली होते. मात्र तापमान ४० डिग्री से. पेक्षा अधिक असल्यास फुलगळ होते. सर्वसाधारणपणे ७५० ते १००० मी.मी. पर्जन्यमान असलेल्या भागात हे पीक येऊ शकते. हे पीक उष्ण तापमानाला फार संवेदनशील आहे. फुले येण्याच्या कालावधीमध्ये जर पाऊस असेल तर फुलांचा मोहर गळतो. एकसारखे ढगाळ वातावरण या पिकास हानिकारक असते. त्यामुळे फुलोरा उशिरा येऊन उत्पादनात घट होते.

**हंगाम व लागवड :** कमी पावसाच्या प्रदेशात खरीप हंगामात जून - जुलैमध्ये पहिल्या पावसानंतर वातावरणात अनुकुल बदल होतो. हवेतील आर्द्रता वाढते. असे हवामान फाटे कलम फुटण्यास किंवा रोपे रूजण्यास अतिशय अनुकुल असते. बागायत परिस्थितीमध्ये शेवग्याची लागवड वर्षभर तिनही हंगामामध्ये करणे शक्य होते.

**लागवडीचे अंतर :** हलक्या ते मध्यम जमिनीमध्ये लागवड अंतर कमी ठेवावे. परंतू भारी जमिनीमध्ये झाडांची वाढ जास्त होत असल्याने अंतर जास्त ठेवावे अन्यथा झाडांची दाटी होऊन फवारणी करणे शेंगा काढणे जिकिरीचे होते.

जमिनीच्या प्रकारानुसार व्यापारी तत्वावर शेवगा पिकांचे चांगले उत्पादन घेण्यासाठी ३ X ३ मीटर अंतर ठेवून हेक्टरी ११११ रोपे असणे गरजेचे आहे. शेतात बांधावर लागवडीसाठी तीन ते चार मीटर अंतरावर लावगड करावी. लागवडीपुर्वी ६० सें.मी. लांब रूंद व खोल खड्डे घ्यावे. खड्ड्यामध्ये माती : शेणखत समप्रमाणात मिसळावेत. शेणखतामध्ये सिंगल सुपर फॉस्फेट, ट्रायकोडर्मा, स्फुरद विरघळणारे जीवाणू, निंबोळी पेंड मिश्रण करावे.

**वळण व छाटणी :** शेवग्याचे झाड झपाट्याने वाढणारे असल्यामुळे सहा महिन्यात शेंगा येण्यास सुरुवात होते म्हणून सुरुवातीस वळण देणे गरजेचे आहे. वळण देणे जर व्यवस्थित व वेळीच केले नाही तर झाड उंच वाढून शेंगा काढणे अवघड होते. यासाठी लागवडीनंतर चार महिने झाडांची उंची ५ ते ६ फुटांपर्यंत वाढते. याचवेळी पहिली छाटणी करावी. यावेळी मुख्य खोड जमिनीपासून एक मिटर अतंरावर छाटावे. त्यामुळे खालच्या बाजूला भरपूर फुटवे येतात. या फुटव्यांतील चार जोमदार वाढीचे फुटवे चार दिशेने ठेवून, इतर फुटवे काढून टाकावे. यानंतर सात ते आठ महिन्यांनी चारही फांद्या मुख्य खोडापासून एक मिटर अंतरावर छाटाव्यात. यामुळे झाडाचा मुख्या आराखडा तयार होईल. पुढे झाड जसजसे जुने होईत तसेतसे झाड एप्रिल मे महिन्यात दोन वर्षांनी छाटावे. यामुळे झाड नियमित उत्पादन देईल.

**छाटणीचे फायदे :** वरीलप्रमाणे चार दिशेला चार फांद्या ठेवून झाडाचा आराखडा तयार केल्यास खालील फायदे मिळतात.

१. झाडाची उंची कमी राहून शेंगा कमी उंचीवर काढणीस येतात. शेंगा काढणी सोपी होते.
२. झाडाचा आतील भाग खुला राहून आतील भागात सुर्यप्रकाश व हवा खेळती राहते.
३. रोग / किडींचा प्रादुर्भाव कमी राहतो.
४. फवारणी करणे सोपी जाते.
५. झाडाचा आराखडा तयार असल्यामुळे पुढील छाटणी करणे सोपे जाते.
६. फुल व फळधारणा सर्व दिशेने व आतील भागात होऊन उत्पादन वाढते.